ePaper

# उद्धव ठाकरेंमध्ये ताकद असती तर 50 आमदार सोडून गेले नसते: कदम



| वर्ष - 6 । अंक - 168 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | ।गुरुवार ।दिनांक 29सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महापालिका शाळांत शिक्षकांची वानवा!

## प्रशासनाची उदासीन भूमिका : 21 शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोविड साथीच्या रोगानंतर, महापालिका शाळांमध्ये नावनोंदणी वाढली आहे. कोविड-१९ च्या काळात ज्या पालकांचे आर्थिक नुकसान झाले आणि ज्या पालकांनी आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये टाकले ते त्यांना पुन्हा पालिका शाळांमध्ये घालत आहेत.**



म्हणजे या शाळांना अधिक शिक्षकांची गरज आहे. शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या भरतीमध्ये आधीच असलेल्या अनुशेषाच्या पार्श्वभूमीवर हा तुटवडा आणखीनच वाढला आहे. याचा परिणाम मुलांच्या अभ्यासावर झाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका (पीसीएमसी) संचालित शाळांमध्ये जवळपास २८५ शिक्षकांची कमतरता आहे, तर २१ शाळांमध्ये मुख्याध्यापक नाहीत. शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांसह परिस्थिती सामान्य होत असल्याने लोक पालिका शाळांचा पर्याय निवडत आहेत. मात्र, शिक्षकांच्या कमतरतेमुळे योग्य शिक्षण न घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी समस्या निर्माण झाली आहे.पीसीएमसीमध्ये मराठी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांच्या शाळांसह 105 महापालिका शाळा आहेत. माध्यमिक शाळांमध्ये 18,893 मुले आणि 20,737 मुली आहेत, तर प्राथमिक शाळांमध्ये 34,735 मुले 937 शिक्षक आणि 68 मुख्याध्यापकांनी शिकवली आहेत. 87 शाळांच्या इमारतींमध्ये प्रत्येक वर्गात सुमारे 30 विद्यार्थी बसू शकतात. तथापि, सध्या 1,158 शाळा शिक्षकांची भरती करण्याची नितांत गरज आहे.

### प्रशासन म्हणते दिवाळीनंतर भरती...

कोविड-19 मुळे शाळा दोन वर्षांपासून बंद होत्या. त्यापूर्वीही, 175 शाळा शिक्षकांची कमतरता होती कारण त्यापैकी बहुतेक सेवानिवृत्त झाले होते आणि अनेकांनी स्वेच्छानिवृत्तीचा पर्याय निवडला होता. जून 2022 मध्ये, लोकसंख्येच्या मोठ्या भागाने त्यांचे वॉर्ड खाजगी शाळांमधून महानगरपालिका शाळांमध्ये स्थलांतरित केले, जे साथीच्या आजाराच्या काळात आर्थिक संकटामुळे होते. ही परिस्थिती पाहून, कंत्राटी पद्धतीने कामावर घेतलेल्या शिक्षकांना 24,000 रुपये पगार देऊन नागरी संस्थेने तात्पुरत्या स्वरूपात टंचाई कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ते पुरेसे नव्हते. याबाबत महापालिका प्राथमिक शिक्षण विभागाचे उपायुक्त संदिप खोत म्हणाले की, दिवाळीच्या सुट्टीनंतर प्राथमिक विभागासाठी शिक्षकांची भरती करणार आहे. "

### शिक्षणाचा दर्जा सुधारावा...

स्मार्ट सिटी अभियानांतर्गत मुलांना इंग्रजी, विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान शिकवण्यासाठी 261 शिक्षकांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात आली होती. कधीकधी, ते तीन विषयांच्या अभ्यासक्रमातील काही भाग समाविष्ट करण्यासाठी महापालिका शिक्षकांना मदत करतात.

# ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ मध्ये महाराष्ट्र अव्वल राहणार!

## डॉ. तानाजी सावंत : राज्य सरकारकडून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

।पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील साडेतीन कोटी माता-भगिनींची आरोग्य तपासणी ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियानाच्या माध्यमातून करण्यात येणार असून या अभियानाच्या माध्यमातून महिला आरोग्याच्या संदर्भात महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर नेणार, असा विश्वास राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी व्यक्त केला.



एसएनडीटी महिला विद्यापीठ येथे आयोजित ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियानाचा शुभारंभ आणि महिला आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.प्रदीप व्यास, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. रुबी ओझा आदी उपस्थित होते.

डॉ. सावंत म्हणाले, घरातील महिला कुटुंबाची सर्व जबाबदारी सांभाळत असते. कुटुंबासाठी झिजताना तिचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

ग्रामीण, शहरी, झोपडपट्टी भागात राहणाऱ्या सर्व महिलांची स्थिती साधारण हीच असते. तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची चिंता करण्यासाठीच राज्यातील मातांसाठी ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियान राबविण्याचे निश्चित केले आहे. राज्यातील शेवटच्या महिलेची आरोग्य तपासणी होईपर्यंत हे अभियान सुरू राहील.

### गरजू रुग्णांना तात्काळ आरोग्य सुविधेसाठी नियंत्रण कक्ष...

ग्रामीण भागातील नागरिकांना तात्काळ आरोग्य सुविधा देण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. नियंत्रण कक्षाला १०४ क्रमांकावर संपर्क करताच अर्ध्या तासात आरोग्य कर्मचारी रुग्णापर्यंत पोहोचेल आणि प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी नेण्यात येईल. लवकरच ही सुविधा सुरू होणार असल्याचे माहिती डॉ.सावंत यांनी दिली.

## शॉर्ट न्यूज

### लोनअ‍ॅपच्या माध्यमातून धमकावून खंडणीची मागणी

।पुणे। महाईन्यूज ।

लोनअ‍ॅपच्या माध्यमातून नागरिकांना धमकावण्याचे सत्र कायम आहे. एका महिलेला धमकावून तिच्याकडे एक लाख ११ हजार रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी सायबर पोलिसांनी बंगळुरूतून नऊजणांना अटक केली.

विघ्नेश मंजुनाथ, गणेश सुब्बारायडू, आकाश एम. व्ही., श्रद्धा सुधाकर गौडा, पार्वती संतोष दास, अश्विनी डी मुरुगन, शिल्पा सुभाष गौडा, प्रिया एस., दीपिका एल. (सर्व रा. बंगळुरू) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरोधात सायबर पोलिस ठाण्यात खंडणी, फसवणूक, अब्रुनुकसानी, धमकावणे आणि माहिती-तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ३० वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे.

# पुणे जिल्हा नियोजन समितीवरील 18 सदस्यांचे पद रद्द!

।पुणे। महाईन्यूज ।

**राज्यातील सर्व जिल्हा नियोजन समित्यांवरील (डीपीडीसी) तसेच कार्यकारी समितीवरील नामनिर्देशित सदस्य आणि विशेष निमंत्रित सदस्य यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार महाविकास आघाडी सरकारने नियुक्त केलेल्या पुणे जिल्ह्यातील डीपीडीसीवरील १८ सदस्यांचे पद रद्द झाले आहे.**



याबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाचे उपसचिव सं. ह. धुरी यांनी प्रसृत केला आहे. राज्यात सत्तांतर होऊन शिंदे-फडणवीस यांचे सरकार स्थापन झाले आहे. त्यामुळे डीपीडीसीवरील महाविकास आघाडी सरकाने केलेल्या सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे जिल्हा नियोजन समितीवर नामनिर्देशित सदस्यांची संख्या चार, तर विशेष निमंत्रित सदस्यांची संख्या १४ इतकी आहे. प्रत्येक जिल्ह्यांसाठी जिल्हा नियोजन समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये नियोजन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. राज्य शासनाकडून जिल्हा नियोजन समितीवर 'नामनिर्देशित सदस्य' म्हणून नियुक्त्या करण्यात येतात. तसेच जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष हे पालकमंत्री असतात. राज्यात ज्या पक्षांची सत्ता त्याच पक्षांच्या कार्यकर्त्यांची या समितीवर वर्णी लावण्यात येते.

### 49 पदे रिक्त

नगरसेवक आणि जिल्हा परिषदेचे सदस्य यांच्या पदाचा कालावधी संपल्याने पुणे जिल्हा नियोजन समितीवरील (डीपीडीसी) त्यांचे सदस्यत्व यापूर्वीच संपुष्टात आले आहे. डीपीसीमध्ये निवडून आलेले ४० सदस्य असून यांचा कार्यकाळ समाप्त झाला आहे. त्यामुळे ४० सदस्य पद रिक्त असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर या सदस्य निवडले जाणार आहेत.

# अठरा टक्के जीएसटीमुळे शेतकरी मेटाकुटीला

## 18 टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) आकारला जात असल्यामुळे शेतकऱ्यांचे मोडतेय कंबरडे



।पुणे। महाईन्यूज ।

**औषधे, रसायने आणि कीडनाशकांच्या किमती मागील वर्षांच्या तुलनेत दीड ते दोन पटीने वाढल्या आहेत. या वाढीव किमतींवर पुन्हा अठरा टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) आकारला जात असल्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे. वाढत्या महागाईमुळे शेतकरी फळपिकांच्या बागा काढून टाकण्याच्या मन:स्थितीत आहेत. नुकत्याच बारामती दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय अर्थमंत्र्यांकडे हा प्रश्न उपस्थित केला असता, त्यांनी राज्याकडे बोट दाखवून जबाबदारी झटकून टाकण्याचा प्रयत्न केला.**

राज्यात द्राक्ष, डाळिंब, संत्रा, मोसबी या फळपिकांचे उत्पादन घेणारे शेतकरी लहरी हवामानामुळे आर्थिकदृष्ट्या तोटय़ात आले आहे. सलग दोन वर्षांपासून होणारे नुकसान सोसून ते पुन्हा नव्या जोमाने कामाला लागले आहेत. पण, औषधे, खते, रसायने आणि कीडनाशकांच्या किमती मागील वर्षांच्या तुलनेत दीड ते दोन पटीने वाढल्या आहेत.

शिवाय वाढलेल्या किमतीवर अठरा टक्के जीएसटी आकारला जात असल्यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोडून पडले आहेत. महागड्या औषधांची फवारणी करण्याची मानसिकता न राहिल्यामुळे यंदा द्राक्षांच्या फळ छाटण्या लांबलेल्या दिसून आल्या. डाळिंब, मोसबी, संत्र्याची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. अतिवृष्टीमुळे फळपिकांसह सर्वच पिकांवर रोग, बुरशीचा प्रादुर्भाव वाढला आहे. अशा स्थितीत औषधांची फवारणी करण्याशिवाय गत्यंतरच नसते. मात्र, औषधांच्या किमतीत मोठी वाढ झाल्यामुळे शेतकरी फवारणी करणेच टाळत आहेत. शिवाय यंदाच्या हंगामात अतिवृष्टीचा फटका बसल्यामुळे फळपिकांच्या बागाच काढून टाकण्याचा निर्णय अनेक शेतकऱ्यांनी घेतल्याचे दिसून येते आहे.

### सीतारामन यांनी जबाबदारी झटकली

**महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार यांनी नुकत्याच बारामती दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन औषधांवरील अठरा टक्के जीएसटीचा मुद्दा उपस्थित केला. सीतारामन यांनी या बाबत कोणताही दिलासा दिला नाही, उलट जीएसटी लागू करण्याबाबतच्या शिफारशी राज्यांकडून केंद्राकडे जातात, या शिफारशींनुसारच कर आकारणीचा निर्णय घेतला जातो, असे सांगून जीएसटीबाबतची जबाबदारी झटकून राज्य सरकारकडे बोट दाखविले. त्यामुळे नजीकच्या भविष्यात केंद्राकडून दिलासा मिळण्याची शक्यता कमीच आहे.**

> मागील वर्षांच्या तुलनेत यंदा रासायनिक खतांच्या किमतीत सुमारे दुप्पट आणि औषधांच्या किमतीत सुमारे दीडपट वाढ झाली आहे. बहुतेक औषधांवर अठरा टक्के जीएसटी आकारला जात आहे. भरमसाठ दरवाढ आणि त्यावर लागलेल्या करामुळे गरज असतानाही शेतकरी खते, औषधांच्या खरेदीकडे पाठ फिरवत आहेत. पिकांना वेळेत खते, औषधे न मिळाल्याचा परिणाम शेतीमालाच्या उत्पादनावर होणार आहे. शेतकऱ्यांमध्ये पिकांसाठी खर्च करण्याची क्षमता आणि मानसिकताच राहिलेली नाही.
>
> – **योगेश उबाळे,** खते, औषध विक्रेते (पाचोरा, जि. जळगाव)




# पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियावर बंदी

## पुण्यात संवेदनशील ठिकाणी बंदोबस्तात वाढ

।पुणे। महाईन्यूज ।

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेवर बंदी घालण्यात आल्यानंतर कोंढवा भागात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरातील कायदा-सुव्यवस्था अबधित ठेवण्यासाठी संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.'पीएफआय''संघटनेच्या कोंढवा भागातील कार्यालयावर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) गेल्या गुरुवारी (२२ सप्टेंबर) छापा टाकला. एनआयएच्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले. एनआयएच्या पथकाने पुण्यासह राज्यातील वेगवेगळ्या भागात कारवाई केली. 'पीएफआय'वर केंद्रशासनाने पाच वर्षांची बंदी घालण्यात आल्यानंतर शहरातील संवेदनशील ठिकाणी बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. कोंढवा भागातील बंदोबस्तात ठेवण्यात आला आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

# समाजमाध्यमावरील ओळखीतून तरुणाची आर्थिक फसवणूक

पुणे- समाजमाध्यमावर झालेल्या ओळखीतून वकिलाने तरुणाची सहा लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणी ॲड. दशरथ वावकर (वय २७, रा. ताथवडे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका तरुणाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ॲड. वावकर आणि तक्रारदार तरुणाची समाजमाध्यमावरुन ओळख झाली. ॲड. वावकर आणि तरुणाची मैत्री झाली. मैत्री झाल्यानंतर दोघे जण एकमेकांच्या संपर्कात आले. ॲड. वावकर याने विवस्त्रावस्थेत छायाचित्रे काढून तरुणास धमकावण्यास सुरुवात केली. छायाचित्रे समाजमाध्यमावर प्रसारित करण्याची धमकी दिली.

# चांदणी चौकातून वाहतुकीस प्रतिबंध!

## मार्गामध्ये बदल : पूल पाडणार असल्याने प्रशासनचे आदेश

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**मुंबई-बंगळूर महामार्गावरील चांदणी चौकातील जूना पूल दि. १ ऑक्टोबर आणि २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये रात्री पाडण्यात येणार आहे. हा पूल स्फोटकांद्वारे पाडण्यात येणार असल्याने या कामाच्या वेळी तसेच तेथील राडारोडा उचलण्याची कार्यवाही होईपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना तेथून प्रवास करण्यास मनाई करण्यात आले आहे. या बाबतचे आदेश पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे यांनी दिले आहेत.**

पूल पाडण्याचे काम १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते २ ऑक्टोबर सकाळी ८ वाजे पर्यंत अथवा अवश्यकतेनुसार सुरु राहणार असून या कालावधी मध्ये वाहनांना येथून प्रवास करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वाहतुकीच्या मार्गामध्ये बदल करण्यात आले आहेत.

मुंबई बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरून मंबई कडून येणारी जड वाहतूक ही उर्से टोलनाका येथेच थांबविण्यात येणार आहे. साताऱ्याकडून येणारी जड वाहतूक ही खेड शिवापूर टोलनाक्याजवळ थांबविण्यात येणार आहे. मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील शिंदेवाडी ते उर्से टोलनाका या दरम्यान दोन्ही बाजूंनी सर्व प्रकारच्या जड वाहनांच्या वाहतुकीस बंदी करण्यात आली आहे.

मुंबई बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील डुक्कर खिंड ते पिंपरी-चिंचवड आयुक्तालय हद्दीतील घोडावत चौक या दरम्यान दोन्ही बाजूने सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीस बंदी राहील.



### साताऱ्याकडून मुंबईकडे जाणा-या हलक्या व प्रवासी चारचाकी वाहनांकरिता...

खेड शिवापूर टोलनाका, शिंदेवाडी, जुना कात्रज बोगदा, कात्रज चौक, पुणे सातारा रोडने जेधे चौक, डावीकडे वळून सारसबाग, पुरम चौक, डावीकडे वळून टिळक रोडने खंडोजीबाबा चौक, फर्ग्युसन रोडने विर चाफेकर चौक, डावीकडे वळून विद्यापीठ चौक, राजीव गांधी पुलावरून औंध वाकड रोडने वाकड चौक, डावीकडे वळून पुढे यु टर्न घेऊन मुंबई बंगळूर राष्ट्रीय महामार्ग, खेड शिवापूर टोलनाका, शिंदेवाडी, जुना कात्रज बोगदा, कात्रज चौक, डावीकडे वळून नवले पूल, वडगाव पूल अंडर पास , सिंहगड रोडने राजाराम पूल, डी.पी.रोड मार्गे नळस्टॉप ,लॉ कॉलेज रोड, सेनापती बापट रोड , विद्यापीठ चौक, राजीव गांधी पुलावरून औंध वाकड रोडने वाकड चौक, डावीकडे वळून पुढे यु टर्न घेऊन मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग. खेड शिवापूर टोलनाका , शिंदेवाडी, जुना कात्रज बोगदा, कात्रज चौक, डावीकडे वळून नवले पूल, वडगाव पूल, वारजे पूल अंडरपास, आंबेडकर चौक, वनदेवी चौक, कर्वे पुतळा चौक, नळस्टॉप, लॉ कॉलेज रोड, सेनापती बापट रोड , विद्यापीठ चौक, राजीव गांधी पुलावरून औंध वाकड रोडने वाकड चौक, डावीकडे वळून पुढे यु टर्न घेऊन मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग असा बदल करण्यात आले असल्याचे पुणे शहर पोलीस वाहतूक विभाग शाखेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### मुंबईहून येणाऱ्या वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग...

**मुंबईकडून येणारी हलकी व प्रवासी चारचाकी वाहने उर्से टोलनाका येथून जुन्या पुणे-मुंबई रस्त्याने भक्ती-शक्ती चौक, नाशिक फाटा, बोपोडी चौक , इंजिनिअरिंग कॉलेज चौक, संचेती चौक, खंडोजी बाबा चौक, टिळक रोडने जेधे चौक, पुणे-सातारा रोडने कात्रज चौक, सरळ जुना कात्रज बोगदामार्गे साताऱ्याकडे किंवा कात्रज चौक, नवले पूल डावीकडे वळून मुंबई बंगळूर राष्ट्रीय महामार्ग असा असणार आहे.**

### वाकड चौकातून पर्यायी मार्ग...

**वाकड चौक डावीकडे वळून राजीव गांधी पुलावरून विद्यापीठ चौक, संचेती चौक, उजवीकडे वळून खंडोजी बाबा चौक, टिळक रोडने जेधे चौक, पुणे-सातारा रोडने कात्रज चौक, सरळ जुना कात्रज बोगदा मार्गे साताऱ्याकडे किंवा कात्रज चौक, नवले पूल डावीकडे वळून मुंबई बंगळूरू राष्ट्रीय महामार्ग राधा चौक डावीकडे वळून बाणेर रोडने विद्यापीठ चौक, उजवीकडे वळून संचेती चौक, उजवीकडे वळून खंडोजी बाबा चौक, टिळक रोडने जेधे चौक, पुणे-सातारा रोडने कात्रज चौक, सरळ जुना कात्रज बोगदा मार्गे साताऱ्याकडे किंवा कात्रज चौक, नवले पूल डावीकडे वळून मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग.**

# सावरगावच्या दसरा मेळाव्याची जोरदार तयारी!

## सदाशिव खाडे : पश्चिम महाराष्ट्रातून 5 हजार नागरिक सहभागी होणार

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली विजयादशमी निमित्त बुधवारी ५ ऑक्टोबर रोजी संत भगवान बाबा यांचे जन्मगाव बीड जिल्ह्यातील सावरगाव येथे भव्य दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास पश्चिम महाराष्ट्रातून पाच हजाराहून जास्त नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.**



थोर संत भगवान बाबा यांनी सुरू केलेली ही परंपरा स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी भगवानगडावर सुरू ठेवली होती. गोपीनाथ मुंडे यांच्या अकाली निधना नंतर लोकनेत्या माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी पुढे ही परंपरा कायम ठेवली. मागील दोन वर्ष कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दसरा मेळावा झाला नाही.

यावर्षीचा दसरा मेळावा सावरगाव येथे पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. या मेळाव्यास महाराष्ट्र व शेजारील राज्यातून ऊसतोड मजूर, वंचित, उपेक्षित, कष्टकरी कामगार व बहुजन समाजातील लाखो नागरिक उपस्थित राहत असतात

यावेळी भगवानबाबा यांचे दर्शन आणि पंकजा मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी पिंपरी चिंचवड मधून माजी उपमहापौर केशव घोळवे, प्रा. गणेश ढाकणे, रघुनंदन घुले, कैलास सानप, दिपक नागरगोजे, हनुमंत घुगे, बाळासाहेब खाडे, गणपत खाडे, प्रा.एस. आर. खाडे, तानाजी ओंबासे, अरुण खरमाटे, अशोक ओंबासे, मयूर घुगे, मानसिंग माळवे, ज्ञानदेव खाडे, भागवत खेडकर, भागवत मुंडे, सुभाष दराडे, भास्कर खाडे यांच्यासह पिंपरी चिंचवड व पश्चिम महाराष्ट्रातून पाच हजाराहून जास्त नागरिक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती सदाशिव खाडे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

# कर सवलतीचे दोन दिवस बाकी; ऑनलाइन कर भरा आणि 4 टक्के सवलत मिळवा!

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका करसंकलन विभागाच्या वतीने 1 जुलै ते 30 सप्टेंबरअखेर मिळकत कराचा ऑनलाइन भरणा केल्यास सामान्यकरात 4 टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी फक्त दोन दिवस बाकी आहेत. (PCMC NEWS) दोन दिवसात जास्तीत-जास्त मिळकत धारकांनी ऑनलाइन कर भरून सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी केले आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागातर्फे शहरातील मिळकतींना कराची आकारणी केली जाते.



महापालिकेच्या कर संकलन विभागाने गतवर्षी सव्वा सहाशे कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविले होते. यावर्षी 1 हजार कोटींचे उदिष्ट ठेवले आहे. त्यानुसार आर्थिक वर्षातील सहा महिने होत असतानाच बुधवारअखेर 352 कोटींचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. संगणक प्रणालीद्वारे मालमत्ताधारकांना मालमत्ता कराचे बिलातील सामान्यकरात विविध प्रर्वगांकरिता सवलती लागू आहेत. मात्र, विविध सवलती 30 जूनपर्यंत लागू होत्या. या सवलतींचा दोन लाख मिळकत धारकांनी लाभ घेतला होता.

मिळकत कराचा ऑनलाइन भरणा वाढावा, ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी कर संकलन विभागाने ऑनलाइन कर भरणाऱ्यांसाठी पुन्हा नव्याने सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. 1 जुलै ते 30 सप्टेंबर 2022 या तीन महिन्याच्या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्या मिळकत धारकांसाठी सामान्य करात 4 टक्के सवलत देण्याचा निर्णय आहे. 4 टक्के सवलत देण्यासाठी संगणक प्रणालीमध्ये सुधारणाही करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मोठ्या प्रमाणात नागरिकांनी ऑनलाइन कराचा भरणा केला आहे.(PCMC NEWS) ऑनलाइन कर भरल्यास सामान्य करात 4 टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी उद्या (दि. 29) आणि परवा (दि.30) असे दोनच दिवस राहिले आहे. त्यामुळे दोन दिवसात जास्तीत-जास्त मिळकत धारकांनी ऑनलाइन कर भरून सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.

## संपादकीय »

# पुरस्कारांचे विज्ञान

***देशातील तरुण वैज्ञानिकांसाठी अत्यंत मानाचा जाणारा पुरस्कार म्हणजे भटनागर पुरस्कार. देशभर विखुरलेल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांची शिखरसंस्था असलेल्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) पहिले महासंचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ शांतिस्वरूप भटनागर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळाला म्हणजे आपल्या संशोधन कार्याची देशातील सर्वोच्च पातळीवरून दखल घेतली,***

देशातील तरुण वैज्ञानिकांसाठी अत्यंत मानाचा जाणारा पुरस्कार म्हणजे भटनागर पुरस्कार. देशभर विखुरलेल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांची शिखरसंस्था असलेल्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) पहिले महासंचालक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ शांतिस्वरूप भटनागर यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळाला म्हणजे आपल्या संशोधन कार्याची देशातील सर्वोच्च पातळीवरून दखल घेतली, असे तरुण (म्हणजे ४५ वर्षांच्या आतील) शास्त्रज्ञांना वाटते. २६ सप्टेंबर हा 'सीएसआयआर'चा वर्धापनदिन. त्या दिवशी भटनागर पुरस्कारांची घोषणा करण्याचा अनेक वर्षांचा प्रघात आहे. यंदा मात्र भटनागर पुरस्कार जाहीर न झाल्याने तो बंद तर केला नाही ना, अशी शंका उपस्थित केली गेली. इतक्या टोकाची शंका उपस्थित होण्याचे कारण दडले आहे, विज्ञान पुरस्कारांच्या फेररचनेच्या प्रस्तावात. १६ सप्टेंबर रोजी केंद्रीय गृह सचिव कुमार भल्ला यांच्या अध्यक्षतेखाली विविध विज्ञान विभागांचे सचिव आणि उच्चाधिकारी यांच्या बैठकीमुळे ही चर्चा सुरू आहे. या बैठकीतील इतिवृत्ताचा अनधिकृत तपशील समाज माध्यमात आला असून, त्यानुसार भटनागर पुरस्कारासह सुमारे शंभर विज्ञान पुरस्कार केंद्र सरकार बंद करणार आहे. यांपैकी बहुतेक पुरस्कार त्या-त्या विभागांद्वारे दिले जातात. या सर्व पुरस्कारांचे निकष, संशोधनाचा दर्जा, पुरस्काराची रक्कम, शिष्यवृत्ती वा पाठ्यवृत्तीचे स्वरूप आदी अनेक मुद्द्यांचा फेरविचार करायला हवा आणि पुरस्कारांची भाऊगर्दी कमी करावी, असा विचार या बैठकीत मांडला गेल्याची चर्चा आहे. भटनागर पुरस्कार आहे त्या स्वरूपात सुरू ठेवायचा, त्यात बदल करायचा की तो बंद करायचा याबाबत निर्णय झाला नसल्याचे सांगण्यात येते. या निमित्ताने पुरस्कारांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

संशोधनाच्या क्षेत्रात देशातील पुरस्कारांची संख्या दोनशेहून अधिक आहे. त्यांपैकी चार राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आहेत, तर ५४ पुरस्कार शिष्यवृत्ती वा पाठ्यवृत्तीच्या स्वरूपाचे आहेत. ५६ पुरस्कार विभागांतर्गत दिले जातात, तर ९७ पुरस्कार विविध खासगी देणग्यांमधून दिले जातात. या पुरस्कारांमुळे संबंधित संशोधकांचा सन्मान होतो, त्यांच्या कार्याची दखल घेतली जाते आणि त्यांना प्रोत्साहन मिळते. मग ते थांबविले का जातात याचा विचार व्हायला हवा. पुरस्कार उदंड झाल्याने त्यांची परिणामकारकता संपते, हे खरेच आहे

## आनंदी सकाळ

### स्वतःचे साक्षीदार स्वतःच व्हायला हवे...

समाज अनेक घटकांपासून तयार होतो. त्यात सर्व प्रकारचे सारेच आले. या सर्वांशी आपल्याला व्यवहार करावा लागतो. तो करताना चांगली माणसं कोण, हे काही त्यांच्या कपाळावर लिहिलेले नसते. पण चांगुलपणा ओळखण्यासाठी परस्पर विश्वास लागतो. मग संशयाचे ढग विरतात. अज्ञान, स्वार्थ, चंचल स्वभाव, द्वेष, मत्सर, न्यूनगंड, पूर्वग्रह, हलके कान आणि अतिविश्वास यामुळे संशय निर्माण होतो. तो बळावला तर मन दुर्बल होते. श्रद्धा नाश पावते. अनेकदा आर्थिक फटका बसतो. संबंध खराब होतात. मानसिक संतुलन बिघडते. प्रेम विश्वासाला तो मुकतो. समाजात एकाकी पडतो. त्यामुळे हा संशय भयंकर असतो. विश्वास कमजोर असेल तर संशयाचा शिरकाव होतो. तो कुणालाच स्वस्थ बसू देत नाही. कारण ते दुकोटीचे ज्ञान आहे. दुकोटी म्हणजे अर्धे खाटे आणि अर्धे सत्य यावरील विश्वास. हे बरोबर की ते बरोबर, हे खोटे की ते खोटे अशी धारणा तयार होते, त्यालाच संशय म्हणतात.

# वनक्षेत्राचा 'संरक्षित' ठसा






पुणे जिल्ह्यातील पश्चिम घाटाच्या लगतचा भाग नुकताच संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून जाहीर झाला आहे. अभयारण्य जाहीर करण्याऐवजी ठरावीक वन क्षेत्राला राखीव दर्जा देऊन वन्यजीवांच्या संरक्षणाचा हा प्रयत्न स्तुत्य असला, तरी तो सर्वसामान्यांना सोप्या भाषेत समजायला हवा.

पुणे जिल्ह्यातील पश्चिम घाटाच्या लगतचा भाग नुकताच संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून जाहीर झाला आहे. अभयारण्य जाहीर करण्याऐवजी ठरावीक वन क्षेत्राला राखीव दर्जा देऊन वन्यजीवांच्या संरक्षणाचा हा प्रयत्न स्तुत्य असला, तरी तो सर्वसामान्यांना सोप्या भाषेत समजायला हवा.

गेल्या काही वर्षांत नागरीकरणाच्या रेट्यात अनेक प्रकल्पांसाठी पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर आघात झाले. बेसुमार वृक्षतोड तर झालीच; पण त्यासोबत अनेक डोंगर सपाट कधी झाले कळलेही नाही. पर्यावरण संतुलनासाठी जंगलाचे प्रमाण कमी झाले, तर त्याचे विपरीत परिणाम सर्वच सजीव प्राण्यांवर होतात. काही वनस्पती, झाडे आणि प्राणी-पक्ष्यांची संख्या कमी होऊ लागते. विकासासाठी पर्यावरणाला 'साइड ट्रॅक'वर टाकणाऱ्या मनुष्यप्राण्याला त्याचे हादरे बसू लागतात. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाची चळवळ व्यक्ती, संस्था यांच्यासह जेव्हा सरकारला गरजेची वाटू लागते, तेव्हा काही आश्वासक बदल घडताना दिसतात. गेल्या काही महिन्यांत राज्य सरकारने संवर्धन राखीव क्षेत्रांच्या संख्येत (कॉन्झर्व्हेशन रिझर्व्ह) बरीच वाढ केली. पुण्यातील पश्चिम घाटांच्या लगतचा जवळपास साडेचारशे चौरस किलोमीटरचा संपूर्ण भाग नुकताच संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून करण्यात आला आहे. पुणे महापालिकेची सध्याची हद्द पाचशे चौरस किलोमीटर आहे. म्हणजेच जवळपास पुणे महापालिकेच्या क्षेत्राएवढा पुणे महानगराच्या लगतचा संपूर्ण परिसर आता वन्यजीवांच्या संरक्षणासाठी राखीव झाला आहे.

पुणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील जुन्नरजवळ नाणेघाटापासून या राखीन वनक्षेत्राची सुरुवात होते. त्यात भोरगिरी, वेल्हा-मुळशी, राजमाची, लोणावळा आणि भोर असे सहा परिसर निश्चित झाले आहेत. हा संपूर्ण भाग पश्चिम घाटाशी जोडलेला आहे. याच परिसरात ताम्हिणी आणि भीमाशंकर ही दोन घनदाट अभयारण्ये आहेत. त्यामुळे हा संपूर्ण परिसरच पर्यावरणीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील आहे. भविष्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत नागरीकरण आणि औद्योगिकरण वेगाने होऊ घातले आहे. अशावेळी त्याचा भार या वन्यजीवांसाठीच्या राखीव क्षेत्रामध्ये होऊ नये, यासाठी सरकारने वेळीच काही पावले टाकली आहेत. पुण्यातील वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातमध्ये गेल्यावरून सध्या आजी-माजी सत्ताधाऱ्यांमध्ये दररोज वादाच्या नव्या ठिणग्या पडत असताना, संवर्धन राखीव क्षेत्राबाबत मात्र दोन्ही सरकारमधील पर्यावरणमंत्री एकाच भूमिकेवर ठाम असल्याचे सुखद चित्र दिसले आहे.

# सुरक्षा परिषदेत बदल आवश्यक

आज जागतिक राजकारणात आमूलाग्र बदल झालेले आहेत. अशा स्थितीत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत समयोचित बदल झाले पाहिजेत. भारताला सुरक्षा परिषदेचे कायम सभासदत्व द्यावे, या मागणीकडे या दृष्टीने पाहावे लागेल. सुरक्षा परिषदेची फेररचना आता फार लांबवता येणार नाही...

आज जागतिक राजकारणात आमूलाग्र बदल झालेले आहेत. अशा स्थितीत संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत समयोचित बदल झाले पाहिजेत. भारताला सुरक्षा परिषदेचे कायम सभासदत्व द्यावे, या मागणीकडे या दृष्टीने पाहावे लागेल. सुरक्षा परिषदेची फेररचना आता फार लांबवता येणार नाही...

संयुक्त राष्ट्रसंघाच्या नुकत्याच झालेल्या आमसभेत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी चीन आणि पाकिस्तानला चार शब्द सुनावले. हे देश भारताविरुद्धच्या दहशतवादाला खतपाणी घालतात, असा भारताचा आरोप आहे. लवकरच भारताला 'जी-२०'चे अध्यक्षपद मिळणार असल्याचा उल्लेख करत जयशंकर म्हणाले, आम्ही 'जी-२०'च्या मदतीने विकसनशील देशांना भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधू. अन्नसुरक्षा, ऊर्जा सुरक्षितता, जल-वायू प्रदूषणाच्याही समस्यांना चव्हाट्यावर आणू. परराष्ट्रमंत्र्यांच्या कामगिरीचे



कौतुक करताना भारताने केलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेच्या पुनर्रचनेच्या मागणीची चर्चा करणे महत्त्वाचे ठरते. भारत अनेक वर्षे करीत असलेल्या मागणीचा नवा आयाम म्हणजे करोनाची साथ. तिचा सामना करताना जगाला सुरक्षा परिषदेच्या मर्यादा लक्षात आल्या. त्यावरील युरोप आणि अमेरिकेच्या वर्चस्वामुळे जगातील अनेक गरीब देशांना योग्य वेळी, योग्य प्रमाणात खास करून वैद्यकीय मदत मिळू शकली नाही. आज सुरक्षा परिषदेत अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया आणि चीन असे पाच कायम सभासद आहेत. यांच्या जोडीला दोन वर्षांसाठी निवडलेले गेलेले दहा सभासद असतात. या रचनेत बदल झाला पाहिजे. एकविसाव्या शतकातील जगाचे राजकारण एवढे बदलले आहे की १९४५ सालची स्थिती आज नाही. या नव्या परिस्थितीचे प्रतिबिंब सुरक्षा परिषदेच्या कायम सभासदत्वात पडावे या दृष्टीने अनेक वर्षे सुरू असलेल्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. आज जर्मनी, जपान वगैरे महत्त्वाचे देश आहेत. पण इंग्लंड किंवा फ्रान्स तितके महत्त्वाचे देश नाहीत. हे नवे वास्तव लक्षात घेऊन या परिषदेच्या पुनर्रचनेची मागणी सतत होते. विद्यमान पाच कायम सभासदांपैकी चार देश दुसरे महायुद्ध जिंकणारे जेते देश आहेत. फक्त चीन हा जर्मनी-इटली-जपानला हरवणाऱ्या दोस्त राष्ट्रांच्या आघाडीत नव्हता. थोडक्यात सुरक्षा परिषद म्हणजे 'दुसरे महायुद्ध जिंकणाऱ्या राष्ट्रांचा गट' आहे. हा विचार बाजूला ठेवला, तरी पाच कायम सभासदांत चार देश युरोपचे प्रतिनिधित्व करतात तर आशिया खंडाचे प्रतिनिधित्व फक्त चीनकडे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सुख पाहतां जवापाडें ।
दुःख पर्वता एवढें ॥१॥
धरीं धरीं आठवण ।
मानीं संताचें वचन ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### राज्याची बाजू मांडण्यासाठी १३० वकिलांची फौज



।मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील सत्तांतरानंतर शिवसेनेतील ठाकरे विरुद्ध शिंदे गट अशी न्यायालयीन लढाई सुरू असतानाच, सर्वोच्च न्यायालयात तसेच दिल्लीतील इतर न्यायालयांमध्ये दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र सरकारची बाजू मांडण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने १३० वकिलांच्या नेमणुका करण्यात आली आहे. त्यात सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश उदय लळित यांचे पुत्र ॲड. श्रीयांश लळित यांच्यासह मुकुल रोहतगी, नीरज कौल, अरविंद दातार, श्याम दिवाण, सत्यरंजन धर्माधिकारी, महेश जेठमलानी, राज्याचे माजी महाधिवक्ता दायरस खंबाटा, आदी नामवंत वकिलांचा समावेश आहे. **वर्तवण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात अमेरिकेच्या कापूस बाजारात भाव कोसळू लागले होते.**

# देशातील पहिले कांदळवन उद्यान गोराईत!

## सिंगापूरमधील उद्यानाच्या धर्तीवर उभारणी; मार्च 2023 पर्यंत पर्यटकांसाठी खुले



।मुंबई । महाईन्यूज ।

**सिंगापूरच्या धर्तीवर साकारण्यात येणारे भारतातील पहिले कांदळवन उद्यान बोरिवलीमधील गोराई खाडीलगत आकाराला येणार असून मार्च २०२३ पर्यंत या उद्यानाचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचा दावा वन विभागाने केला आहे.**

कांदळवन उन्नत मार्ग (बोर्ड वॉक) हे या उद्यानातील प्रमुख आकर्षण असणार आहे. मुंबईला लाभलेल्या समुद्रकिनारा आणि कांदळवनामुळे जैवविविधता तग धरून आहे. या निसर्गसंपदेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी; तसेच त्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कांदळवन कक्षाने 'पर्यावरण पर्यटन प्रकल्प' हाती घेतला आहे. त्याचबरोबर कांदळवन संवर्धन केंद्र आणि कांदळवन उद्यान उभे करण्यात येत आहे. गोराई येथे आठ हेक्टर क्षेत्रावर २६.९७ कोटी रुपये खर्च करून, तर दहिसर येथे ३० हेक्टर क्षेत्रावर ४८.८० कोटी रुपये खर्च करून कांदळवन उद्यान विकसित केले जाणार आहे. गोराई कांदळवन उद्यान हे गोराई जेट्टीजवळ असून तेथे समृद्ध कांदळवने दिसतात. तेथे निसर्ग पर्यटन केंद्र आणि कांदळवन उन्नत मार्ग हे मुख्य आकर्षण आहे. सध्या निसर्ग पर्यटन केंद्राचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. एकही झाड न तोडता, निसर्गाची हानी होणार नाही, अशा पद्धतीने कांदळवन उद्यानाची निर्मिती होणार आहे. हे उद्यान सर्वसामान्यांना आकर्षित आणि शिक्षित करेल, अशी रचना तयार करण्यात आली आहे. उद्यानाला भेट देणाऱ्यांना मुंबईतील कांदळवन परिसंस्थेचे महत्त्व, कांदळवनाचे मानवाला असणारे फायदे समजणार आहेत. यासह कांदळवनाच्या संवर्धनाची आवश्यकता आणि संवर्धनासाठी उपाय कोणते याची माहिती मिळणार आहे. कांदळवन उद्यानाची माहिती देणारे एक ॲप तयार करण्यात येत आहे. सिंगापूर, अबूधाबी, थायलंड या देशात असलेल्या कांदळवनातील उन्नत मार्गासारखा उन्नत मार्ग गोराईत तयार करण्यात येणार आहे. हा मार्ग लाकडी असून त्याची लांबी ७०० मीटर आणि रुंदी २.४ मीटर असेल. तसेच या मार्गाच्या जागोजागी विश्रांतीस्थळ आणि माहितीस्थळ उभारण्यात येणार आहेत. या उन्नत मार्गाचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. हा उन्नत मार्ग तयार करताना कोणत्याही वनस्पतीची हानी होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे, अशी माहिती वनविभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

### सौरऊर्जा निर्मिती

साकारण्यात येणाऱ्या या केंद्रात कांदळवन परिसंस्थेतील वनस्पती आणि प्राण्यांची माहिती देऊन जनजागृती करण्यात येणार आहे. हरित ऊर्जेचा वापर आणि ऊर्जेचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने १२० किलोवॅट प्रतितास क्षमतेच्या 'बिल्डिंग इंटिग्रेटेड फोटो व्होल्टिक' (बीआयपीव्ही) प्रणालीच्या माध्यमातून सौरऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्यानाची एकूण ८० टक्के ऊर्जेची गरज पूर्ण होईल, असा विश्वास या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

**~~गोराई कांदळवन उद्यान हे गोराई जेट्टीजवळ असून तेथे समृद्ध~~ कांदळवने दिसतात. तेथे निसर्ग पर्यटन केंद्र आणि कांदळवन उन्नत मार्ग हे मुख्य आकर्षण आहे. सध्या निसर्ग पर्यटन केंद्राचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. एकही झाड न तोडता, निसर्गाची हानी होणार नाही, अशा पद्धतीने कांदळवन उद्यानाची निर्मिती होणार आहे. हे उद्यान सर्वसामान्यांना आकर्षित आणि शिक्षित करेल, अशी रचना तयार करण्यात आली आहे.**

# मराठी मातीत जन्मलेल्या लतादीदी या भारत देशाच्या रत्न - मुख्यमंत्री शिंदे!

## देवेंद्र फडणवीसांनी दिला आठवणींना उजाळा



।मुंबई । ।महाईन्यूज ।

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२० व २०२१ वितरण समारंभ मुंबईत पार पडला. यावेळी गायिका उषा मंगेशकर आणि बासुरी वादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री उदय सामंत, मंत्री दीपक केसरकर या समारंभाला उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "लतादीदींच्या गळ्यात 'सरस्वती'चा वास होता.

मराठी मातीत जन्मलेल्या लतादीदी या भारत देशाच्या रत्न झाल्या, ही आपल्या महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. लता मंगेशकर संगीत महाविद्यालयाचे उद्घाटन पार पडलं आहे. त्याच्या कामात काही अडथळे आले होते. मात्र, देवेंद्र फडणवीस आणि मी अडथळे पार करण्याची शर्यत आम्ही जिंकत चाललो आहोत. त्यामुळे कोणतेही अडथळे आता महाविद्यालयाच्या कामात येणार नाही," असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "करोनात वाईट सर्वांना पाहावे लागले. मात्र, करोनाचे एका गोष्टीसाठी आभार मानेल, कारण पुरस्काराचे वितरण झालं नाही. त्यामुळे एवढ्या महान व्यक्तींना पुरस्कार देण्याचं भाग्य मला आणि एकनाथ शिंदे यांना मिळालं.

### "लतादीदींचं सर्व अनमोल आहे"

"मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने लता मंगेशकरांच्या नावाने आंतराष्ट्रीय संगीत विद्यालयाची सुरुवात करण्यात आली आहे. अतिशय सुंदर आणि आधुनिक अशी इमारत बांधण्यात येणार आहे. लतादीदींचं सर्व अनमोल आहे, त्याच मोल होऊ शकणार नाही. काही अडथळे आले होते, ते मुख्यमंत्र्यांनी दूर केले आहेत. सर्व संगीताच्या प्रकाराचे या महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण दिलं जाणार आहे. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंना आनंद देऊन त्यांच्या डोळ्यात अश्रू पाहणाऱ्या दीदी होत्या. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदींना भूरळ घालणाऱ्या सुद्धा दीदी होत्या. दीदींचा हा प्रवास अतिशय थक्क करणारा आहे. त्यांच्यामध्ये ईश्वराचा अंश होता," असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# पालघर तालुक्यात प्रेम प्रकरणातून मुलीवर गोळीबार प्रयेशीसह प्रियकराचा मृत्यू

।बोईसर । महाईन्यूज ।



पालघर तालुक्यात बोईसर खैरापाडा येथील टीमा रुग्णालयाजवळ झालेल्या गोळीबार गोळीबारात एका 23 वर्षीय मुलीचा मृत्यू झाला असून गोळीबारानंतर पळण्याच्या नादात अपघात होऊन तरुणाचा देखील मृत्यू झाला आहे. या तरुणाकडून गावठी कट्टा हस्तगत करण्यात आला आहे. मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव नेहा महतो असे आहे.

खैरेपाडा येथील एका उद्यानात बराच वेळ एकत्र राहिल्यानंतर या जुगल जोडीने टीमा रुग्णालयाजवळ एकमेकांना आलिंगन देऊन फोटो काढले. आज दुपारी 3.30 वाजता सुमारास बोईसर पोलीस स्टेशन हद्दीत टिमा शासकीय रुग्णालया समोर कृष्णा सत्यदेव यादव याने त्याची प्रेयसी नेहा दिनेश महतो हिच्यावर गावठी पिस्तूलामधून फायरिंग केली. सदर घटनेत मुलगी नेहा हिचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर डी डेकॅर कंपनी समोर आरोपीने सीआयएसएफच्या वाहनाखाली उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला असून आरोपीस उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केले असता आरोपीचा देखील मृत्यू झाला आहे. पिस्तूल हस्तगत करण्यात आलेले आहे.

पोलिसांनी घटनेचा पुढील तपास सुरू केलेला आहे.

# 'पीएफआय'वर बंदी!

## देशव्यापी अटकसत्रानंतर केंद्राची कारवाई

।पीटीआय ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' (पीएफआय) या संघटनेवर केंद्र सरकारने बुधवारी पाच वर्षांची बंदी घातली. आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली. केंद्रीय गृह मंत्रालयाने मंगळवारी रात्री उशिरा 'पीएफआय'वरील बंदीबाबत निवेदन प्रसृत केले. त्यात 'पीएफआय'सह तिच्याशी संबंधित ८ संघटनांवरही बंदी घालण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. "स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) आणि जमात-उल-मुजाहिद्दीन बांगलादेश (जेएमबी) या बंदी घातलेल्या संघटनांचे सदस्य 'पीएफआय'चे संस्थापक आहेत. आयसिससारख्या जागतिक दहशतवादी संघटनांशी 'पीएफआय'चे धागेदोरे आढळून आले आहेत. एका समाजाच्या धार्मिक भावना भडकवून त्यांना दहशतवादी संघटनांमध्ये सामील केले जात होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन 'पीएफआय' आणि अन्य संघटनांवर बंदी घालण्यात येत आहे," असे या निवेदनात म्हटले आहे.

'पीएफआय'वरील बंदीच्या निर्णयाचे भाजप नेते, भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. एमआयएमचे अध्यक्ष खा. असदुद्दीन ओवेसी यांनी 'पीएफआय'च्या विचारसरणीला विरोध असला, तरी बंदी योग्य नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. बंदी हा उपाय नसून 'पीएफआय'सारख्या संघटनांना राजकीयदृष्ट्या एकटे पाडले पाहिजे, असे मत माकप नेते सीताराम येचुरी यांनी व्यक्त केले. काँग्रेसने मात्र यावर सावध प्रतिक्रिया दिली. 'समाजाचे ध्रुवीकरण करण्यासाठी धर्माचा वापर करणाऱ्या सर्व विचारसरणी आणि संघटनांना काँग्रेसचा विरोधच आहे,' असे काँग्रेस महासचिव जयराम रमेश यांनी स्पष्ट केले. कोल्लम (केरळ) : केंद्राने बंदीची घोषणा करताच केरळमधील 'पीएफआय'चे महासचिव अब्दुल सत्तार यांनी संघटना विसर्जित केल्याचे फेसबुकवरून जाहीर केले. संघटनेच्या सर्व सदस्यांनी आपले काम थांबवावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. २३ सप्टेंबरच्या 'केरळ बंद'मध्ये झालेल्या हिंसाचारानंतर सत्तार फरार होते.



**'पीएफआय'प्रमाणेच द्वेष पसरविणाऱ्या सर्व संघटनांवर बंदी घालायला हवी. त्यात सर्वात आधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली पाहिजे.**

**– लालूप्रसाद यादव, अध्यक्ष, राजद**

**संघाने कोणतेही देशविरोधी किंवा समाजविरोधी काम कधीही केलेले नाही. मूर्खासारखे बोलणारे आपल्याकडे कमी नाहीत. त्यांच्याबाबत अधिक न बोलणेच चांगले.**

**– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र**

### बंदी घातलेल्या संघटना

- पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय)
- कँपस फ्रंट ऑफ इंडिया (सीएफआय)
- रेहाब इंडिया फाउंडेशन
- ऑल इंडिया इमाम काउंसिल
- नॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ ह्युमन राईट ऑर्गनायझेशन्स
- नॅशनल वुमेन्स फ्रंट
- ज्युनियर फ्रंट
- एम्पॉवर इंडिया फाउंडेशन
- रेहाब फाउंडेशन, केरळ

## राजस्थान मुख्यमंत्रीपद, काँग्रेस अध्यक्षपदाचे गूढ कायम!

### अशोक गेहलोत दिल्लीत, अध्यक्षपदी नव्या नावांची चर्चा

।जयपूर ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



काँग्रेसच्या अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार आणि अशोक गेहलोत पक्षाध्यक्ष झाल्यास राजस्थानचे मुख्यमंत्री कोण होणार हे गूढ अद्याप कामय आहे. गेहलोत दिल्लीत पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांची भेट घेण्याची शक्यता आहे. ते अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल करणार की अन्य कुणाला पक्षश्रेष्ठींची पसंती मिळणार, याची उत्सुकता ताणला गेली आहे.

"मुख्यमंत्री हे पक्षाच्या १०२ आमदारांचे पालक आहेत. या आमदारांच्या भावना ते दिल्लीला जाऊन पक्षनेतृत्वाच्या कानावर घालतील," असे गेहलोतांचे समर्थक असलेले राजस्थानचे मंत्री प्रतापसिंह खचारियावास म्हणाले. गेहलोत अध्यक्षपद निवडणुकीसाठी अर्ज भरण्याबाबत पक्षनेतृत्वाचा निर्णय घेईल, मात्र ते आताच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार नसल्याचेही खचारियावास यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दिल्लीला निघण्यापूर्वी गेहलोत यांनी सोनिया गांधींशी संपर्क साधल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### गेहलोत यांचा पत्ता कट?

अशोक गेहलोत यांना पक्षाध्यक्ष होण्यासाठी काँग्रेस नेतृत्वाची सर्वाधिक पसंती होती. मात्र राजस्थानात घडलेल्या घटनांमुळे सोनिया गांधी आपला विचार बदलण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अद्याप गेहलोत यांचे नाव पूर्णपणे मागे पडले नसले, तरी पक्षाने अन्य नावांवर विचार सुरू केल्यामुळे त्यांचा पत्ता कापला जाऊ शकतो. अर्ज भरण्याची मुदत शुक्रवारी संपणार असल्यामुळे गुरुवारी काँग्रेसमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी घडू शकतात.

# सीएसएमटीसह नवी दिल्ली, अहमदाबाद रेल्वेस्थानकांचा होणार कायापालट

## मुंबईतील CSMT जगातील 2रे आश्चर्यकारक रेल्वे स्थानक

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) रेल्वे स्थानकासह नवी दिल्ली आणि अहमदाबाद रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी घेतला. या पुनर्विकासाच्या प्रकल्पासाठी मंत्रिमंडळाने १० हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी ही माहिती दिली.

सर्व स्थानकांचा पुनर्विकास सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) या तत्त्वावर करण्यात येणार नसून अभियांत्रिकी-खरेदी- बांधकाम (ईपीएस) या तत्त्वावर करण्यात येणार आहे, असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. पीपीपी तत्त्वामुळे प्रवाशांवर अतिरिक्त बोजा टाकला जातो, त्यामुळेच हा निर्णय घेण्यात आला आहे, असे वैष्णव म्हणाले. "मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय यांना रेल्वे सेवा पुरवते. त्यामुळे प्रवाशांवर अतिरिक्त बोजा टाकणे योग्य नाही. अर्थसंकल्पातील निधी रेल्वेमध्ये गुंतवून या प्रकल्पास निधी पुरवण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडूनही या प्रकल्पात गुंतवणूक करण्यात येणार आहे. त्यामुळेच ईपीएस तत्त्वावर या स्थानकांचा पुनर्विकास करण्याचा हा निर्णय जाणीवपूर्वक घेण्यात आला आहे, असे वैष्णव यांनी सांगितले. या स्थानकांची रचना



### स्थानकात काय?

- या स्थानकांत फूड कोर्ट, वेटिंग लाउंज, मुलांसाठी खेळण्याची जागा आणि स्थानिक उत्पादने विकण्याची जागा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.
- नवी दिल्ली रेल्वे स्थानकाजवळ बस, रिक्षा आणि मेट्रो यांची सेवा देण्यात येणार आहे.
- अहमदाबाद रेल्वे स्थानकाची पुनर्रचना मोढेराच्या सूर्य मंदिरापासून प्रेरित आहे. सीएसएमटीच्या जागतिक वारसास्थळ असलेल्या इमारतीला स्पर्श केला जाणार नाही. परंतु जवळपासच्या इमारतींचा पुनर्विकास केला जाणार आहे.

### पुनर्विकासासंबंधी...

- पहिल्या टप्प्यात दररोज ५० लाख लोकसंख्या असलेल्या १९९ स्थानकांचा पुनर्विकास करण्याचे नियोजन आहे. ४७ स्थानकांसाठी निविदा निघाल्या असताना, ३२ स्थानकांवर काम सुरू आहे.
- नवी दिल्ली स्थानकाचा पुनर्विकास साडेतीन वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. मुंबई सीएसएमटी आणि अहमदाबाद रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.
- सीएसएमटी, नवी दिल्ली आणि अहमदाबाद रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासासाठी पुढील १० दिवसांत निविदा जारी केल्या जातील.

या तीन प्रमुख स्थानकांसह १९९ स्थानकांच्या पुनर्विकासाची एकूण किंमत ६० हजार कोटी रुपये आहे.

# "महाराष्ट्र आहेच लय भारी"

रानबाजार' या वेबसीरिजमुळे जोरदार चर्चेत आलेली प्राजक्ता माळी ही तिच्या अभिनयामूळे लोकप्रिय आहे. त्याच बरोबर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' यामूळे ती घराघरात पोहचली आहे. अभिनयाबरोबरच तिला भ्रमंती करण्याची प्रचंड आवड आहे. प्राजक्ता महाराष्ट्राबरोबर भारता बाहेरही फिरली आहे. ती याबद्दल अनेकदा लिहिते पोस्टही करते. ती सध्या लंडनवारी करतेय.त्याचे फोटोही तिने सोशल मिडियावर शेअर केले आहे.तिने तिच्या चाहत्यांना जागतिक प्रवास दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.यासाठी तिने खास व्हिडीओ पोस्ट केला आहे.या व्हिडीओत तिने महाराष्ट्रातील काही पर्यटन स्ठळे दाखवली आहेत ज्यांना तिने भेटी दिल्या आहेत. यात मुंबई ,धारावी, पुणे, रत्नागिरी,कोल्हापूर ,लोणावळा ,नागपूर, अमरावती येथील तिचे फोटोज आणि व्हिडीओ आहेत. देशभरातल्या विविध ठिकाणांचा VIDIO POST केल्यावर लक्षात आलं, महाराष्ट्रातल्या ठिकाणांचाही VIDEO करायला हवा... त्याचा प्रवास तर फारच हृदयाजवळचा आहे... मी केवळ मराठी आहे म्हणून नाही तर “महाराष्ट्र” आहेच लय भारी.. माझं भाग्य की “मस्त महाराष्ट्र” कार्यक्रम, इतर अनेक शुटींग्स आणि इव्हेंट्सच्या निमित्तानं मला जवळपास सबंध महाराष्ट्र बघता, फिरता आला... ( ह्य ।



# नवऱ्याचा वाढदिवस ठरला लकी! आलियाला मिळाला हा मानाचा पुरस्कार

बॉलीवूडमधील सध्या चांगलं चर्चेत असलेलं क्यूट कपल म्हणजे रणबीर कपूर आणि आलिया भट्ट. लवकरच रणबीर आणि आलियाच्या (ALIA BHATT) घरी एक छोटा पाहुणा येणार आहे. दोघेही लवकरच आई बाबा होणार आहेत. शिवाय त्यांच्या चित्रपटांची आणि नव्या घराचीही चर्चा आहे. अशातच आज रणबीरच्या वाढदिवसानिमित्त त्या दोघांनाही एक छानशी गुड न्यूज मिळाली आहे. बॉलीवूडचा चॉकलेट बॉय रणबीर कपूरचा आज ४०वा वाढदिवस. रणबीर आणि त्यांची पत्नी आलिया यांच्यासाठी आजचा दिवस अत्यंत खास आहे. किंवा आलियाला रणबीरचा वाढदिवस लकी ठरला असंही म्हणता येईल. कारण आजच 'टाईम 100 इम्पॅक्ट पुरस्कारा'साठी (TIME 100 IMPACT AWARD) आलियाची निवड झाली आहे. हा अत्यंत मानाचा असा पुरस्कार आलियाने पटकावला आहे. आलियाने सोशल मीडिया पोस्ट शेअर करत यासंदर्भात माहिती दिली आहे. सिनेक्षेत्रातील योगदानाबद्दल तिला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आलियाला हा पुरस्कार मिळाल्याने सोनी राजदानदेखील आनंदी झाल्या आहेत. 2022 मध्ये आलिया 'गंगूबाई काठियावडी', 'आरआरआर', 'डार्लिंग्स', 'ब्रह्मास्त्र' अशा हिट सिनेमांत आपली दमदार कामगिरी



दाखवली. म्हणूनच तिचा सन्मान करण्यात येणार आहे.

# नागिन'पासून 'जुनून'पर्यंतची मौनीची बोल्ड जर्नी

'क्योंकी सास भी कभी बहू थी' पासून तर ब्लॉकबस्टर चित्रपट 'ब्रह्मास्त्र' पर्यन्त असा लांबचा पल्ला गाठणारी अभिनेत्री मौनी रॉय हिने तिच्या मेहनतीच्या जोरावर तिची वेगळीच ओळख निर्माण केली आहे. मौनी रॉय आज तिचा 37 वा वाढदिवस साजरा करत आहे. 28 सप्टेंबर 1985 रोजी कूचबिहारमध्ये ती जन्मली . सेंट्रल स्कूलमधून शालेय शिक्षण घेतल्यानंतर तिने मिरांडा हाऊस कॉलेजमधून ग्रॅज्युएशन केले. मौनीने जामिया मिलिया इस्लामियामध्ये मास कम्युनिकेशनमध्ये प्रवेश घेतला होता. पण मौनी रॉयला सुरुवातीपासूनच अभिनयाची आवड होती, त्यामुळे तिने मास कम्युनिकेशनचे शिक्षण मधेच सोडले आणि ती मुंबईला आली.मौनीला आधीपासूनच अभिनेत्री बनायचं होत. अभिनयाचा वारसा तिला आपल्या घरातूनच मिळाला आहे. मौनीचे आजोबा शेखर चंद्र रॉय आणि आई मुक्ती हे प्रसिद्ध थिएटर कलाकार आहेत.



# जिच्या हसण्यावर भलेभले व्हायचे फिदा

बॉलीवूडची धकधक गर्ल माधुरी दिक्षित आजकाल डान्स रिॲलिटी शो 'झलक दिखला जा 10' चं परिक्षण करत आहे. शो मध्ये माधुरीचे नेहमीच एकापेक्षा एक दिलखेचक लूक पहायला मिळत आहेत. या वीकेन्डच्या एपिसोडसाठी माधुरी सेटवर पोहोचली,त्यावेळी ती सी-ग्रीन रंगाच्या लेहेंग्यात पहायला मिळाली. ऑरेंज रंगाच्या बॉर्डरनं हा लेहेंगा सजलेला होता. माधुरीनं कानात ड्रेसला मॅचिंग दिसतील असे झुमके घातले होते. तर हातात रंगबिरंगी बांगड्या घालून माधुरीनं तिच्या लूकला चार चॉद लावले होते. डान्स रिॲलिटी शो चं शूटिंग मुंबईत फिल्म सिटीमध्ये होत आहे.

या शूटिंग दरम्यानचा एक व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे, पण यावरनं



आता माधुरीला ट्रोल केलं गेल्याचं समोर आलं आहे. आणि ते ही तिला तिच्या सौंदर्यावरनं ट्रोल केलं जातंय हे मोठं आश्चर्य. नेटकऱ्यांनी माधुरीला तिच्या चेहऱ्यावरनं खूप उलट-सुलट सुनावलं आहे. पापाराझीला जेव्हा माधुरी दिक्षित पोझ देत होती तेव्हा त्यावेळच्या तिच्या स्माइलला नेटकरी 'आर्टिफिशियल' , 'फेक स्माईल' म्हणतायत. काही लोकांनी तर तिला थेट सवाल केलाय की, 'माधुरी तू बोटॉक्स सर्जरी केलीयस का?' एका नेटकऱ्याने माधुरी दिक्षितच्या बोटॉक्स लूकवर कमेंट करत लिहिलं आहे,'हे तर जरा जास्तच बोटॉक्स आहे'. माधुरीनं आपल्या स्माइलसोबत काहीतरी केलं आहे,ते नैसर्गिक वाटत नाही. माधुरी दिक्षितचा मेकअप खूप जास्त झाला आहे ते देखील व्हिडीओत स्पष्ट दिसत आहे. माधुरीच्या चेहऱ्याची स्कीन इतकी टाइट वाटतेय की त्यामुळे स्पष्ट कळतंय की माधुरीनं बोटॉक्स करुन घेतलं आहे. आता बोटॉक्सची ट्रीटमेंट सर्रास करून घेतली जाते. अभिनेत्री तर डोळ्यांखालचा काळसरपणा,सुरकुत्या लपवण्यासाठी आणि स्कीन टाइट करण्यासाठी बोटॉक्स ट्रीटमेंट घेतात. माधुरी दिक्षित सध्या 'झलक दिखला जा १०' ची परिक्षक म्हणून काम पाहतेय. माधुरी दिक्षितसोबत करण जोहर,नोरा फतेही या शो चे परिक्षक म्हणून काम पाहत आहेत.

# तू तर मुस्लिम तरीपण...' अभिनेत्यानं पत्रकाराची केली बोलती बंद!

देशात मनोरंजन क्षेत्रातील वातावरण सध्या वेगळ्या प्रकारे समोर येत असल्याचे दिसून आले आहे. गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूड बॉयकॉट असा ट्रेंड सुरु आहे. त्याचा फटका मोठमोठ्या अभिनेत्यांना बसला आहे. बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमार आणि मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानच्या लाल सिंग चड्ढाला मोठा मानसिक त्रास यानिमित्तानं सहन करावा लागला होता. आता एक असाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामध्ये त्या चित्रपटाच्या पत्रकार परिषदेमध्ये अभिनेत्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नावरुन मोठा गदारोळ झाल्याचे दिसून आले आहे. बनारस हा चित्रपट येत्या काही दिवसांमध्ये प्रदर्शित



होणार आहे. त्यामध्ये जैद खान हा प्रमुख भूमिकेत आहे. त्याच्या प्रमोशनसाठी आयोजित करण्यात आलेल्या एका पत्रकार परिषदेनं सोशल मीडियावरुन लक्ष वेधून घेतले आहे. त्यामध्ये जैदला एका पत्रकारानं इस्लामवरुन प्रश्न विचारला. त्यावर जैदनं दिलेलं उत्तर चर्चेत आलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### हरमनप्रीत कौरची पाचव्या स्थानावर झेप



**। दुबई । महाईन्यूज**

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत एका दीड शतकासह कमालीचा फॉर्म दाखवणारी महिला कर्णधार हरमनप्रीत कौर हिने महिलांच्या एकदिवसीय क्रमवारीत चार गुणांची झेप घेत पाचवे स्थान मिळवले आहे. हरमनप्रीतच्या भारतीय संघाने इंग्लंडला त्यांच्याच भूमीत ३-० असा व्हाईटवॉश देणाचा पराक्रम प्रथमच केला.

मालिकेतील दुसऱ्या सामन्यात हरमनप्रीने १११ चेंडूत नाबाद १४३ धावांची झंझावाती खेळी साकार केली होती. भारतीय कर्णधारासह सलामीवर स्मृती मानधना आणि दीप्ती शर्मा यांनीही क्रमवारीत प्रगती केली होती.त्यानंतर १० धावांची भर घालून अभिमन्यू बाद झाला. त्याने ३५ चेंडूंत ८ चौकारांसह ३९ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या कर्णधार संजू व तिलक यांनी डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ९९ धावांची भागीदारी केली.

# पुनीत बालन ग्रुपच्या शिवांशला रौप्य, तर सोनियाला कांस्य पदक

## तिसरी माऊंट एव्हरेस्ट चषक खुली तायक्वांदो स्पर्धा

**।पुणे। महाईन्यूज ।**

**जी- २ दर्जाच्या तिसऱ्या माऊंट एव्हरेस्ट चषक खुल्या तायक्वांदो स्पर्धेत पुनीत बालन ग्रुपच्या शिवांश त्यागीने रौप्य तर सोनिया भारद्वाजने कांस्य पदकाची कमाई केली. या स्पर्धेमुळे दोन्ही खेळाडूंची आंतरराष्ट्रीय रँकिंग सुधारण्यासाठी मोठी मदत होणार आहे. नेपाळ येथील पोखरा येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**





या स्पर्धेत पुनीत बालन ग्रुपचे सहाय्य असणाऱ्या या दोन्ही खेळाडूंनी पदकाला गवसणी घातली. शिवांश त्यागीने आपल्या सर्वच लढतीमध्ये दमदार खेळाचे प्रदर्शन करताना आपल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले.

मात्र, अंतिम लढतीत भारताच्या खेळाडूकडून पराभूत व्हावे लागल्याने शिवांशला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

### आगामी स्पर्धेत देखील सुवर्ण पदकासाठी नक्की प्रयत्न करतील

याविषयी बोलताना उद्योजक पुनीत बालन म्हणाले, दोन्ही गुणवान खेळाडूंनी भारतासाठी पदक आणले ही बाब सुखावणारी आहे. सरावातील सातत्य आणि आक्रमक शैली यामुळेच दोन्ही खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी बजावत आहेत. आगामी स्पर्धेत देखील सुवर्ण पदकासाठी ते नक्की प्रयत्न करतील, असा आम्हाला विश्वास आहे.

सोनिया भारद्वाजने देखील चमकदार कामगिरी बजावताना कांस्य पदकाची कमाई केली. सोनियाला देखील दुसऱ्या उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला.

तत्पूर्वी झालेल्या सर्व लढतीत सोनियाने आक्रमक खेळ करताना प्रतिस्पर्ध्यांना नॉकआऊट केले. या स्पर्धेमुळे आम्हा दोघांचेही आंतरराष्ट्रीय मानांकन सुधारणार असून भारतात परतल्यावर पुन्हा नव्या स्पर्धेसाठी कसून सराव करणार असल्याचे सोनिया भारद्वाज यांनी सांगितले.

# राहुलने सिक्स मारून संपवला सामना

## भारत मालिकेत 1-0 ने आघाडीवर



**। चेन्नई । महाईन्यूज ।**

तिरुवनंतपुरम येथे झालेल्या पहिल्या T20I सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा 8 विकेट्सनी पराभव केला. तीन सामन्यांच्या T20I मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. टीम इंडिया सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. अलीकडेच टीम इंडियाने टी-20 मालिकेत ऑस्ट्रेलियाचा 2-1 असा पराभव केला होता. भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धही आपला धडाकेबाज फॉर्म कायम ठेवला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा T20 सामना 2 ऑक्टोबर रोजी गुवाहाटी येथे खेळवला जाणार आहे.

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने 20 षटकांत 8 गडी गमावून 106 धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने 20 चेंडू बाकी असताना 8 गडी राखून सामना जिंकला. भारताकडून सूर्यकुमारने 50 आणि केएल राहुलने 51 धावा केल्या.

107 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. तिसऱ्या षटकातच भारताने कर्णधार रोहित शर्माची विकेट गमावली. तो खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. विराट कोहलीही 9 चेंडूत तीन धावा करून बाद झाला. यानंतर केएल राहुल आणि सूर्यकुमार यादव यांनी तिसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत भारताला विजय मिळवून दिला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही